कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी-२(स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) संवर्गातील बदली.

**महाराष्ट्र शासन**

**शासन आदेश क्र : बदली २०२६/प्र.क्र.५३/२०२६/आ (शा.अ.) (ई-१६७८६४१)**

**जलसंपदा विभाग, मंत्रालय,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : -११ जून, २०२६

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) मधील तरतुदींनुसार जलसंपदा विभागाअंतर्गत कार्यरत असलेले सोबतच्या विवरणपत्रातील (स्तंभ-२ मध्ये) नमूद केलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/ सहायक अभियंता, श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी (स्तंभ-४ नुसार) विनंतीनुसार व प्रशासकीय निकड विचारात घेऊन बदली करण्यात येत आहे.

२. सोबतच्या विवरणपत्रातील अभियंत्यांना स्तंभ क्र.३ मधील मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि स्तंभ क्र.४ मधील मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता यांनी तात्काळ रुजू करुन घ्यावे.

३. सोबतच्या विवरणपत्रातील ज्या अभियंत्यांना बदलीने/पदोन्नतीने वा अन्य कारणांमुळे रिक्त होणाऱ्या पदांवर पदस्थापना दर्शविलेली आहे, ती पदे रिक्त होण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील संबंधित कार्यरत अभियंत्यांची प्राधान्याने बदली करावी. रिक्त पदांअभावी, संबंधित अभियंत्यांना सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करावा लागल्यास, अशा प्रकरणी संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांस जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

४. संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिनस्त अभियंत्यांच्या शासनस्तरावरील करण्यात आलेल्या बदल्यांची संख्या विचारात घेऊन बदली अधिनियमातील तरतुदीनुसार ३० % च्या मर्यादेतच आपल्या स्तरावरील बदल्या होतील याची दक्षता घ्यावी.

५. संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, शासनाने निर्गमित केलेल्या आदेशात क्षेत्रीय स्तरावर कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. पदस्थापनेच्या ठिकाणी पद

रिक्त नसेल अथवा अन्य कारणांमुळे बदली कार्यान्वित करण्यास प्रशासकीय अडचण उद्भवत असेल तर, अशा बाबतीत शासनास तात्काळ अवगत करुन अहवाल सादर करावा.

६. शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील संबंधित अभियंत्यास कोणत्या दिनांकास कार्यमुक्त करण्यात आले व नवीन नियुक्तीच्या जागी संबंधित अभियंता कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबतचा अहवाल कार्यमुक्तीच्या व रुजू करुन घेण्याच्या आदेशासह शासनास doesttsectengr.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावा.

७. संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/ सहायक अभियंता श्रेणी-२ यांच्या बदलीची अंमलबजावणी करताना सदर बदलीच्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत मंजूर पदांपेक्षा जास्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी-२ कार्यरत राहणार नाहीत, याची सर्वार्थाने दक्षता घ्यावी.

८. वरीलप्रमाणे बदली करण्यात येत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/ सहायक अभियंता श्रेणी-२ यांच्या कार्यमुक्ती आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच, अंतिम वेतन प्रमाणपत्र (Last Pay Certificate/LPC) बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

९. प्रस्तुत आदेशातील विनंतीनुसार बदली करण्यात आलेल्या अभियंत्यांना बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

१०. संबंधित अभियंत्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करण्यात येऊ नये. तसेच, म.ना.से.(रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

११. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत

संबंधित अभियंता यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१२. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१३. सदरहू आदेशातील जे अभियंते जनगणना, २०२७ संदर्भातील कर्तव्यावर नियुक्त असतील अशा अभियंत्यांना जनगणना, २०२७ शी संबंधित कामकाजातून मुक्त केल्यानंतर बदलीच्या पदावर हजर होण्यास कार्यमुक्त करण्यात यावे.

१४. संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१७/(१७३/१७)/आ (वर्ग-२), दि.१२.०७.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०६१११२३३०१६२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DAYANAND SHANKARAPPA MUNJALE

Digitally signed by DAYANAND SHANKARAPPA MUNJALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department, 2.5.4.20=831AD18B348F1D88937E4F113316B4AD736A2C6A66B967F985FDA6404A710D52, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=769837FC2DFA139EC865E57A65285ECC3B258063EF784EF02AB4270A0B358FBC, cn=DAYANAND SHANKARAPPA MUNJALE
Date: 2026.06.11 12:35:21 +05'30'

**(दयानंद शं.मुंजाळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (जलसंपदा) (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (जलसंपदा) (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (खारभूमी), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. प्रधान सचिव (जसं.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (लाक्षेवि/ प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
७. संबंधित कार्यकारी संचालक/ महासंचालक, जलसंपदा विभाग
८. संबंधित मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
९. महालेखापाल-१/२(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१०.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
११.संबंधित अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
१२.संबंधित कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग.
१३.सह सचिव (प्रशा.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.आ (शा.अ.) कार्यासन संग्रहार्थ.

| विवरणपत्र<br>शासन आदेश क्र.बदली-२०२६/प्र.क्र.५३/२०२६/आ (शा.अ.)(ई-१६७८६४१), दि.११/०६/२०२६ चे सहपत्र. | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | अभियंत्याचे नांव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | बदली करण्यात आलेले ठिकाण |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.रियाज मामुद शेख, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग, धुळे अंतर्गत लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग, सामोडे | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत उत्तर कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा ठाणे अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, शहापूर अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प बांधकाम उपविभाग, कळवा ठाणे **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| २ | श्री.रोशन राजाराम साळवे, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे अंतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन बांधकाम उपविभाग क्र.१, शिंदखेडा | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ,धुळे अंतर्गत गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक अंतर्गत चणकापूर कालवा उपविभाग, देवळा **(श्री.विकास धनगर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी)** |
| ३ | श्री.सौरभ राजेंद्र जमादार, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव अंतर्गत गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, भडगांव अंतर्गत गोंडगाव शाखा, **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| ४ | श्री.रोहित शहाजी सावंत, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव अंतर्गत उपसा सिंचन बांधकाम विभाग, जळगांव अंतर्गत वरणगांव तळवेल उपसा सिंचन बांधकाम उपविभाग क्र.२, काहुरखेडा | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव अंतर्गत गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, धरणगांव अंतर्गत पाटशाखा धरणगांव **(श्री.संदिप पेंढार यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी)** |
| ५ | श्री. अभिजीत नारायण किन्होळकर, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत यवतमाळ सिंचन मंडळ, यवतमाळ अंतर्गत अरुणावती पाटबंधारे विभाग, दिग्रस अंतर्गत अरुणावती पाटबंधारे उपविभाग क्र.२, दिग्रस | मुख्य अभियंता (स्था), जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे अंतर्गत गुण नियंत्रण मंडळ, नागपूर अंतर्गत गुण नियंत्रण विभाग, अमरावती अंतर्गत गुणनियंत्रण उपविभाग, अमरावती **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| ६ | श्री. आदर्श प्रमोद पोपटकार कनिष्ठ अभियंता, | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत जिगांव प्रकल्प पाटबंधारे मंडळ, शेगाव अंतर्गत जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगाव अंतर्गत जिगांव धरण उपविभाग, मलकापूर | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग , अमरावती अंतर्गत जिगांव प्रकल्प पाटबंधारे मंडळ, शेगाव अंतर्गत जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगाव अंतर्गत जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र.१, जळगाव जामोद **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |

| अ.क्र. | अभियंत्याचे नांव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | बदली करण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७ | श्री.तुषार अविनाश डोंगरे, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ चंद्रपूर अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग चंद्रपुर अंतर्गत पोथरानाला प्रकल्प उपविभाग, हिंगणघाट(मु. चंद्रपूर) | मुख्य अभियंता, गोसिखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर अंतर्गत, लघु पाटबंधारे विभाग, वर्धा, अंतर्गत धाम प्रकल्प उपविभाग पिपरी (वर्धा) **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| ८ | श्री. अभिनव अनिल सातव, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा अंतर्गत बुलढाणा पाटबंधारे विभाग, बलढाणा अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, मेहकर अंतर्गत सिंचन शाखा, दुसरबीड, | मुख्य अभियंता विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प बांधकाम उपविभाग क्र. ३ अमरावती **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| ९ | श्री. गौरव राजेंद्र जुवार, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा अंतर्गत खडकपुर्णा प्रकल्प विभाग, देऊळगांव राजा अंतर्गत जिगांव प्रकल्प पुनर्वसन उपविभाग क्र.३ नांदुरा | मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती अंतर्गत घुंगशी प्रकल्प उपविभाग क्र.१, मुर्तिजापुर(बांध) **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| १० | श्रीमती स्वाती नंदलाल सोंदिया, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, गोसिखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर अंतर्गत आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण विभाग क्र. १, मूल अंतर्गत आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकर उपविभाग क्र. ३, मूल | मुख्य अभियंता, गोसिखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा) अंतर्गत आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापुर अंतर्गत मोखाबर्डी उपसा सिंचन उपविभाग क्र. १ भिवापूर **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| ११ | श्री. अक्षय पंढरीनाथ कस्तुरे, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत भंडारा सिंचन मंडळ, भंडारा अंतर्गत बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग गोंदिया | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत भंडारा सिंचन मंडळ, भंडारा अंतर्गत बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया अंतर्गत बाघ पाटबंधारे व्यवस्थापन उपविभाग, आमगांव अंतर्गत बाघ पाटबंधारे व्यवस्थापन शाखा, पुजारीटोला **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| १२ | श्री. जगदीश प्रकाश पाटील, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग, धुळे विभागीय कार्यालय | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव अंतर्गत तापी खोरे सर्वेक्षण व अन्वेषण विभागीय पथक , जळगांव अंतर्गत तापी खोरे सर्वेक्षण व अन्वेषण उपविभाग, रावेर **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |

| अ.क्र. | अभियंत्याचे नांव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | बदली करण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १३ | श्री. प्रमोद काशिनाथ चौरे, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक अंतर्गत पुनंद धरण उपविभाग, जयदर जि.नाशिक | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथक, नंदुरबार अंतर्गत विभागीय कार्यालय, नंदुरबार **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| १४ | श्री.गौरव सुधीर देसाई, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत ठाणे पाटबंधारे मंडळ, अंतर्गत ठाणे अंतर्गत ठाणे पाटबंधारे विभाग, कळवा ठाणे अंतर्गत पाटबंधारे उपविभाग क्र.१, कळवा जि.ठाणे | कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे येथील रिक्त पदी **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| १५ | श्री. दिपक इंद्रजित गावित, सहायक अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन विभाग, धुळे अंतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन बांधकाम उपविभाग क्र. ४, धुळे जि. धुळे | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक अंतर्गत माणिकपुंज मध्यम प्रकल्प उपविभाग, नांदगाव **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |
| १६ | श्री. विकास दिपकराव खडसे, कनिष्ठ अभियंता | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव अंतर्गत तापी खोरे सर्वेक्षण व अन्वेषण विभागीय पथक, जळगांव अंतर्गत तापी खोरे सर्वेक्षण व अन्वेषण उपविभाग, धारणी | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग , अमरावती अंतर्गत उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती अंतर्गत उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती अंतर्गत उर्ध्व वर्धा पाटबंधारे उपविभाग क्र.५ तळेगाव **(विनंतीनुसार/रिक्त पदी)** |

DAYANAND
SHANKARAPPA
MUNJALE

Digitally signed by DAYANAND SHANKARAPPA MUNJALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department,
2.5.4.20=831AD18B348F1D88937E4F113316B4AD736A2C6A66B967F985FDA6404A710D52, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=769837FC2DFA139EC865E57A65285ECC3B258063EF784EF02AB4270A0B358FBC, cn=DAYANAND SHANKARAPPA MUNJALE
Date: 2026.06.11 12:35:36 +05'30'

**श्री.दयानंद शं. मुंजाळे,**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**